| MHNS130004012020 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल तारीख | :– | २४/०७/२०२० |
| | नोंदणी तारीख | :– | २४/०७/२०२० |
| | निकाल तारीख | :– | ०६/०४/२०२६ |
| | कालावधी | :– | वर्ष, महीना, दिवस |
| | | | ०५ ०८ १३ |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पिंपळगांव ब., ता.निफाड, जि.नाशिक.**

**(पिठासीन अधिकारी श्री. ए.जे. पाटील)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१९४/२०२०** **निशाणी क्रमांक २५**

**प्रथम खबर मधील तपशिल** :–

अपराध क्रमांक : ०३/२०२०, दिनांक ०५/०१/२०२०

पोलीस स्टेशन : ओझर, ता.निफाड, जि.नाशिक.

| | |
|---|---|
| **अभियोगपक्ष –** | महाराष्ट्र सरकारतर्फे, पोलीस स्टेशन अधिकारी, पोलीस स्टेशन ओझर, ता.निफाड, जि.नाशिक. |
| **अभियोगपक्षातर्फे विधीज्ञ –** | श्रीमती ए.ए.शेख |
| **आरोपी –** | **राहुल पुरुषोत्तम झोमन,** वय–३५ वर्षे,<br>रा.कुर्णोली, ता.दिंडोरी, जि.नाशिक. |
| **आरोपीतर्फे विधिज्ञ –** | श्री. पी.आर.घुमरे |

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेली तारीख | ०५/०१/२०२० |
| गुन्हा दाखल तारीख | ०५/०१/२०२० |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | १७/०३/२०२० |
| दोषारोप निश्चीत केल्याची तारीख | १०/०२/२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०१/०४/२०२६ |
| न्यायनिर्णयाकरिता राखीव ठेवलेली तारीख | ०६/०४/२०२६ |

| | |
| --- | --- |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०६/०४/२०२६ |
| शिक्षेची तारीख, जर दिली असेल तर | –––– |

## आरोपीचे विवरण

| अ.क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर/ सुचनापत्रावर सोडल्याची तारीख | दोषारोप | शिक्षा अथवा निर्दोष मुक्त | शिक्षेबाबत विवरण | उपभोगलेली शिक्षा |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| १. | राहुल पुरुषोत्तम झोमन | ०८/०१/२०२० | ०८/०१/२०२० | भा.दं.वि.कलम ४५१, ३५४, ३२३, ५०४ आणि ५०६ अन्वये | निर्दोष | ––– | ––– |

## तपासलेले साक्षीदार

**अ. अभियोगपक्षातर्फे :–**

| अ.क्र. | साक्षीदारांचे नाव | पुराव्यातील स्थान | निशाणी |
| --- | --- | --- | --- |
| सा.क्र.१. | नांव गोपनीय ठेवण्यात आले | फिर्यादी | २० |
| सा.क्र.२ | नांव गोपनीय ठेवण्यात आले | फिर्यादीचा पती | २२ |

**ब. बचावपक्षातर्फे :– नाही.**

**क. न्यायालयातर्फे :– नाही.**

## निशाणी क्रमांकाची यादी

**अ. अभियोगपक्षातर्फे :–**

| अ.क्र. | निशाणी | पुराव्याचे स्थान |
| --- | --- | --- |
| १. | २१ | सा.क्र.१ च्या फिर्यादवरील सहीस |
| २. | –– | सा.क्र.१ च्या फिर्यादमधील मजकुरास रेखांकित भाग–अ |
| ३. | –– | सा.क्र.२ च्या जबाबातील मजकुरास रेखांकित भाग–अ |

**ब. बचावपक्षातर्फे :– नाही.**

**क. न्यायालयातर्फे :– नाही.**

**ड. मुद्देमाल :– नाही.**

.......................................................................................................................

## न्यायनिर्णय

## (घोषित दिनांक ०६ एप्रिल, २०२६)

१) आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान,१८६० चे कलम (संक्षिप्त ''भा.दं.वि.'') ४५१, ३५४, ३२३, ५०४ आणि ५०६ अन्वये खटला चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाचे संक्षिप्त कथन खालीलप्रमाणे** –

२) फिर्यादीच्या पतीचा कृषी खते, औषधे विक्री व शेती विषयक मार्गदर्शन करणे हा व्यवसाय आहे. आरोपी व फिर्यादीचा पती हे सन २०१६ साली धनश्री एग्रो या कंपनीत कामाला होते. तेव्हापासून आरोपी व फिर्यादीचा पती यांची मैत्री होती. फिर्यादीच्या पतीने सदरची कंपनी सोडून दिली. त्यानंतर आरोपीने त्याला लागणारी शेती उपयोगी औषधे व खते फिर्यादीच्या पतीला मागितली. त्यामुळे फिर्यादीच्या पतीकडे असलेले काही औषधे व त्याच्याकडे नसलेले औषधे व खते असे ओझर गावांतील सतिष चव्हाण, प्रकाश होन व फिर्यादीचा लहान भाऊ यांच्याकडून मर्चिंग पेपर सह इतर खते असे एकुण रु.४४,०००/– चा माल आरोपीला घेवून दिला. आरोपीने सदरचे पैसे लवकर देण्याचे फिर्यादीच्या पतीला सांगितले. फिर्यादीच्या पतीने आरोपीकडे वारंवार पैशाची मागणी केली. परंतु आरोपीने ते पैसे दिले नाही व उडवा उडवीचे उत्तरे दिलीत.

३) दि.०५/०१/२०२० रोजी दुपारी ०३:०० वाजताच्या सुमारास फिर्यादीचा पती घरी जेवण करण्यासाठी आला. तेव्हा त्याने फिर्यादीला सांगितले की, आरोपीने त्याला पैसे घेण्यासाठी सायखेडा फाटा येथे बोलावून घेवून पैशाच्या देवाण घेवाणच्या व्यवहारावरुन दारु पिवून त्याला वाईट साईट शिवीगाळ करुन मारहाण केली. त्यानंतर दुपारी ०४:०० वाजताच्या सुमारास फिर्यादी व तिची मुलगी असे घरी

असतांना आरोपी हा त्यांचा घराचा पत्ता विचारत फिर्यादीचा घराचा दरवाजा वाजविला. फिर्यादीने दरवाजा उघडला असता आरोपीने फिर्यादीला लोटून घरात प्रवेश केला. त्यानंतर फिर्यादीच्या समोर तिच्या पतीला लाथाबुक्यांनी मारहाण केली. फिर्यादी सोडविण्यासाठी गेली असता आरोपीने तिची साडी ओढून तिला लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. तसेच त्यांना शिवीगाळ करुन तुमचा बेत पाहतो असा दम दिला.

४) फिर्यादीने ओझर पोलिस ठाणे येथे आरोपीविरुध्द फिर्याद दाखल केली. सदर तक्रारीवरुन अपराध क्र.०३/२०२० नोंद झाला. पो.हवा./१२५५/के.बी.यादव यांनी गुन्हयाचा तपास केला. त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. फिर्यादी व साक्षीदारांचे जबाब नोंदविले. त्यांचे न्यायालयात जबाब नोंदविले. आरोपीला अटक केली. संपूर्ण तपासाअंती आरोपीविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

५) आरोपीविरुध्द भा.दं.वि.चे कलम ४५१, ३५४, ३२३, ५०४ आणि ५०६ अंतर्गत दोषारोप (निशाणी १५) निश्चीत केले. आरोपीने गुन्हा नाकबूल केला व संपरिक्षेची मागणी केली.

६) अभियोग पक्षाने प्रस्तुतच्या खटल्यात एकुण दोन साक्षीदारांची साक्ष नोंदविली. आरोपीविरुध्द अभिलेखावर पुरावा उपलब्ध नसल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३(१) (ब) (संक्षिप्त ''फौ.प्र.सं.'') अन्वये आरोपीचे बयाण नोंदविण्यात आले नाही.

७) दोन्ही पक्षातर्फे युक्तीवाद ऐकण्यात आला. खालील मुद्दे न्यायनिर्णयाकरिता माझे विचारार्थ असून त्यावर मी सकारण निष्कर्ष नोंदविले आहे.

| अ.क्रं. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | दि.०५/०१/२०२० रोजी दुपारी ०३:०० वाजताच्या सुमारास फिर्यादीच्या घरी, कासार गल्ली, | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | ओझर, ता.निफाड, जि.नाशिक, येथे फिर्यादी व तिच्या पतीला त्रास देण्याच्या उद्देशाने किंवा गुन्हा करण्याच्या उद्देशाने फौजदारीपात्र गृहअतिक्रमण केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | | **नकारार्थी...** |
| २. | वरील नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने तिच्यावर फौजदारीपात्र बलप्रयोग केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | | **नकारार्थी...** |
| ३. | वर नमुद तारखेस, ठिकाणी व वेळी आरोपीने फिर्यादी व तिच्या पतीला लाथाबुक्यांनी मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | | **नकारार्थी...** |
| ४. | वर नमुद तारखेस, ठिकाणी व वेळी आरोपीने फिर्यादी व तिच्या पतीचा उद्देशपुर्वक अपमान करुन त्यांना प्रक्षोभित केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | | **नकारार्थी...** |
| ५. | वर नमुद तारखेस, ठिकाणी व वेळी आरोपीने फिर्यादी व तिच्या पतीला मारण्याची धमकी दिल्याचे अभियोगपक्ष सिध्द केले काय ? | | **नकारार्थी...** |
| ६. | अंतिम आदेश काय ? | | **आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात आले.** |

## कारणमिमांसा

### मुद्दे क्र.१ ते ५ च्या अनुषंगाने –

८) फिर्यादीने तिच्या सरतपासात सांगितले की, तिचा पती शेती विषयक सल्लागार म्हणून व्यवसाय करतो. ती आरोपीला ओळखते. तो तिच्या पतीचा मित्र आहे.

शेतीच्या पावडरवरुन तिचे पती व आरोपी यांच्यात वाद झाला होता. त्यांच्यामध्ये पैशाच्या येण्यावरुन वाद झाला होता. किती रकमेवरुन वाद झाला होता हे तिला सांगता येत नाही. दि.०५/०१/२०२० रोजी तिचे पती व आरोपीत यांच्यात वाद झाला होता. आणखी काही झाले नव्हते. आरोपीने त्यांच्या घरी येवून तिच्या पतीला मारहाण केली व तिचा विनयभंग केला असे घडले नव्हते. तिने पोलिस स्टेशनला फिर्याद दिली होती. परंतु त्यातील मजकूर तिला माहिती नाही.

९) अ.सा.क्र.२ याने त्याच्या सरतपासात सांगितले की, फिर्यादी त्याची पत्नी आहे. तो आरोपीला ओळखतो. तो त्याचा मित्र आहे. त्याचेत व आरोपीमध्ये पैशाच्या कारणांवरुन किरकोळ वाद झाला होता. दि.०५/०१/२०२० रोजी त्याचा व आरोपीचा किरकोळ वाद झाला होता. आणखी काही झाले नव्हते. आरोपीने त्याला दारु पिवून मारहाण केली असे घडले नव्हते. आरोपीने त्याच्या पत्नीला मारहाण केली व तिचा विनयभंग केला असे घडले नव्हते. पोलिसांनी त्याचा जबाब घेतला होता.

१०) फिर्यादी व अ.सा.क्र.२ यांनी पोलिस बयाणातील व न्यायालयातील फौ.प्र.सं.कलम १६४ प्रमाणे बयाणातील मजकूराशी विसंगत साक्ष दिल्याने सहायक सरकारी अभियोक्त्या यांच्या तोंडी विनंतीवरुन भारतीय पुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे उत्तरसूचक प्रश्न विचारण्याची अभियोग पक्षाला परवानगी देण्यात आली. परंतु, दोन्ही साक्षीदारांनी आरोपीने त्यांना मारहाण केल्याचे तसेच फिर्यादीचा विनयभंग केल्याचे नाकारले. साक्षीदारांनी अभियोग पक्षाच्या कथनास दुजोरा दिला नाही. त्यांनी सर्व प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिलीत. तसेच त्यांच्या जबाबामध्ये नमूद घटना घडल्या होत्या असे त्यांनी पोलिसांना व न्यायालयात सांगितले नव्हते असे कथन केले.

११) सदर साक्षीदारांनी अभियोगपक्षास सहाय्य केले नाही. त्यांची व आरोपीची न्यायालयाबाहेर तडजोड केल्याचे त्यांनी कथन केले. त्यांनी अभिलेखावर तडजोड

पुरसीस (निशाणी १९) दाखल केली. त्यामुळे असे दिसून येते की, साक्षीदार हे आरोपीसोबत झालेल्या समझोत्यामूळे आरोपीविरुध्द न्यायालयात काहीही कथन करत नाहीत. त्यामुळे अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द लावण्यात आलेले आरोप निसंशयपणे सिध्द करण्यास अपयशी ठरला. म्हणून मी मुद्दा क्र.१ ते ५ ला नकारार्थी उत्तर नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.६ च्या अनुषंगाने –**

**१२)** मुद्दा क्र.१ ते ५ चे उत्तर नकारार्थी दिल्यामुळे, आरोपी हा या गुन्हयातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. त्या अनुषंगाने मुद्दा क्र.६ च्या उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| १. | **आरोपी राहुल पुरुषोत्तम झोमन** याची फौ.प्र.सं कलम २४८(१) नुसार भा.दं.वि.चे कलम ४५१, ३५४, ३२३, ५०४ आणि ५०६ मधील अपराधातून निर्दोष मुक्तता करण्यात आली. |
| २. | आरोपीचे जमानतपत्र व बंधपत्र रद्द करण्यात आले. |
| ३. | आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ अंतर्गत रुपये १५,०००/– चा जामीन व वैयक्तीक बंधपत्र या न्यायालयात सादर करावा. |
| | न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला. |

स्वा/–

ठिकाण – पिंपळगांव    **(ए. जे. पाटील)**

दिनांक – ०६/०४/२०२६.    न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,

पिंपळगांव ब. ता.निफाड, जि.नाशिक.

Visit ecourts.gov.in for updates or download mobile app “eCourts Services” from Android or iOS